Nutan Vidyalaya Sevabhavi Education Society, Umri

# Late Babasaheb Deshmukh Gorthekar Art's, Commerce & Science Mahavidyalaya, Umri, Dist. Nanded (M.S.)

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
(Recognition U/S 12(B), 2 (F) of the UGC Act 1956)
*Website : www.lbdgmu.in*
*Email: lbdgcollege@rediffmail.com*

## One day Interdisciplinary National Conference

On

# "Rural Development : Issues & Challenges"

21st December 2019

**Organized by**

Internal Quality Assurance Cell
Late Babasaheb Deshmukh Gorthekar Art's,
Commerce & Science Mahavidyalaya, Umri

**Collaboration with**

Swami Ramanand Teerth Marathwada University,
Nanded (M.S)

**Chief Editor**

Dr. Tukaram Vaijanathrao Powale

**Co – Editor**

Dr. Z. R. Pathan,
Dr. D. D. Kolhekar,
Dr. G. P. Yedle
Dr. V. V. Bhoyar

# ऐतिहासिक पर्यटन सहस्त्रकुंड धबधबा

**प्रा. डॉ. वसंत व्यंकटराव कदम**
*इतिहास विभाग प्रमुख*
*हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमामयतनगर*
*ता. हिमायतनगर जि. नांदेड*

भारत देशाला फार मोठा प्राचिन इतिहास व संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. याच संस्कृतीच्या पाऊल खुना महाराष्ट्रतील नांदेड जिल्हा व परिसरात पाहावयास मीळतात या परिसरात विविध कालखंडातील विविध वास्तू, मंदीर स्थापत्य, मुर्तिशिल्प, स्मारके, नैसर्गीक धबधबे तसेच धार्मिक आणि सांस्कृतिक कला वैभवाचा समृध्द वारसा पुरात्तवीय अवपेशंय्या रूपाने आजही आपणास पहावयास मीळतो. ही सर्व धार्मिक, सांस्कृतिक आणि नैसर्गिक स्थळे आज महत्वाची ऐतिहासिक पर्यटन स्थळे ठरतात. प्रस्तुत शोध निबंधात सहस्त्रकुंड धबधबा एक ऐतिहासिक पर्यठन या पर्यटन स्थळाविष्यी माहीती दिली आहे.नांदेड जिल्हा आणि परिसरात आसना—या महत्वपूर्ण ऐतिहासिक पर्यटन स्थळामध्ये आदिवासी असना—या किनवट तालुक्यातील सहस्त्रकुंड धबधब्याचा समावेश होतो. ऐतिहासीक पर्यटन म्हणून प्रसिध्द असनारा सहस्त्रकुंड धबधबा नांदेड जिल्हयाच्या ठिकानापासून पूर्वेस ७५ कि.मी. अंतराव राज्य महामार्ग क्र.२२३ वर ईस्लापूर पासून उत्तरेस २ कि.मी. अंतरावर किनवट पासून अलीकडे पश्चिमेस ४५ कि.मी. अंतरावर आहे. हा महाकाय धबधबा निसर्ग सौंदर्याने युक्त आहे. सहस्त्रकुंड धबधबा बुलढाणा जिल्हयात उगम पावना—या विदर्भ आणि मराठवाडयाची सीमा आखुन देणा—या पैनगंगा (बाणगंगा) नदीवर असून तो विविध राज्यातील पर्यटकांना पाहण्यासाठी आकर्षीत करत आहे. सदरील पैनगंगा नदीवरील सहस्त्रकुंड धबधब्याचा आलिकडील किनारा (भाग) मराठवाडयातील नांदेड जिल्हयात मोडतो तर नदीचा पलिकडील किनारा विदर्भातील यवतमाळ जिल्हयात मोडतो, याच सहस्त्रकुंड धबधब्यापासुन दक्षिणेकडे अगदी ७ कि.मी. अतंरावर आंध्रप्रदेशाच्या आदिलाबाद जिल्हयाचा परिसर आहे.

निसर्गाच्या सोंदर्याने नटलेला सहस्त्रकुंड धबधबा पाहण्यास भारतातील विविध राज्यातुन हजारो पर्यटक येथे येऊन धबधब्याच्या सोंदर्याचा, येथील आल्हाद दायक हवामानचा अस्वाद घेत असतात. येथे मराठवाडा, विदर्भ आणि आंध्रप्रदेशातील पर्यटकांची संख्या अधिक प्रमाणत देसून येते सहस्त्रकुंड ये पर्यटन वर्षभर पर्यटकांना पाहण्यासाठी सध्यातरी निशुल्क खुले असते पण पावसाळा ऋतु पाहाण्यासाठी अत्यंत उत्तम ठरतो, धबधब्याच्या नावाप्रमाणेच ५० फुटापेक्षाही जास्त उंचिवरून पाणी खाली कोसळते पैनगंगेच्या नदिच्या पात्रातील पाषाणावरून सर्व पाण्याचा प्रवाह खालच्या पाषाणावरून पडतो अशा काळयापाषाणावरील पाण्याचेभष्म

करणारे (पर्यटन) ठिकान महाराष्ट्रात कोठेही सापडत नाही. सदरील सहस्त्रकुंड धबधब्याचा आवाज जवळ पास एकाकिलोमिटर पेक्षाही जास्त चौरस की.मी. पर्यंत येत असल्याचे परीगमात सांगीतले जाते,हा धबधबा पाहण्यासाठी तत्कालीन जिल्हाअधिकारी डॉ. श्रीकर परदेशी यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर अंतर्गत जिल्हा नियोजन विभाग, नांदेड यांच्या मार्फत आलिकडील बाजूस धबधब्याच्या काठावर लांब असाएकवॉच टॉवर निर्माण केला आहे यावरून धबधब्याचे चित्तथरारक द्रश्य सर्व पर्यटकाना पाहता येईल पावसाळा या ऋतुमध्ये पैनगंगेला पूर आल्यानंतर एकदा तरी हा सहस्त्रकुंड धबधबा पहावा असे पर्यटकांना वाटते हे पाहिल्यानंतर खरोखरच एक अद्वितीय निसर्गाचा चमत्कार, नैसर्गिक सोंदर्य पाहील्याचा आनंद मिळाल्याशिवाय राहनार नाही.

हा पैनगंगा (बाणगंगा) नदिवरील धबधबा सहस्त्रकुंड धबधबा या नावाने भारतभर प्रसिद्ध आहे. सहस्त्रकुंड या नावाच्या पाठीमागे निश्चितच एक ऐतिहासिक पार्श्वभूमी असले असे प्रत्येक अभ्यासकाला आणि पर्यटकांना वाटने सहजिकच आहे. सहस्त्र याचा शब्दशहा अर्थ ‘एक हजार आणि कुंड’ याचा अर्थ पाण्याने भरलेला कुंप म्हणजेचे एक हजार फुट खोल किंवा त्या पेक्षा आधिक खोल असलेला कुंड म्हणजे सहस्त्रकुंड एक ऐतिहासिक पर्यटनस्थळ म्हणून सहस्त्रकुंड धबधब्याचा अभ्यास करीत असताना या संदर्भात लिखीत साधने अधिक प्रमणात मिळत नाहीत, परंतू सहस्त्रकुंड धबधब्याच्या संदर्भात या परिसरात अनेक आख्यायिका सांगीतल्या जातात लिखित पुरावे उपलब्ध होत नसल्यास आख्यायिका आणि दंतकथा यांना मौखिक साधने मानून त्या आधारे कही प्रमाणात का होईना, परंतू थोडयाफार प्रमाणत धागेदोरे मिळत असतात लेखन कला अवगत होण्यापूर्वी मौखिक साधने होती या मौखिक साधणांच्या आधारे वेगवेगळया कालखांतील तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास केला जातो.

सहस्त्रकुंड धबधब्याच्या संदर्भात अशी एक आख्यायिका सांगीतली जाते की..... ‘विदर्भातील बुलढाणा जिल्हयात उगम पावनारी पैनगंगा (बाणगंगा) नदी आणि माहूर (मातापूर) निवासी परशुराम यांच्या एक बोलनी झाली ती बोलनी अशी होती की, परशुरामास पैनगंगा नदीस माहूरला घेऊन जायाचे होते पैनगंगेचा प्रवाह माहूरकडे नव्हता तरी पण परशुरामास नदी मी माहूरकडे येईल परंतु त्या साठी माझी एक अट आहे. परशुरामाने नदीच्या सर्व अटी मान्य केल्या कारण ती अट मान्य करण्यासारखीच होती ती असी की मी तुझ्या पाठीशी येईल, परंतु तुम्ही मागे वळून पाहनार नाही. असी साधी अट होती’ मग परशुराम पुढे जात होते नदी पाठी मागे येत होती नदीचाप्रवाह सरू होता परशुराम समोर जात होते आज ज्या ठीकानी हा सहस्त्रकुंड धबधबा आहे त्याठीकानी परशुराम थांबले कारण मागे नदीचा खळाळनार आवाज ऐकू येत नव्हता. पैनगंगा आपल्या पाठीशी येत नाही आपल्यासी धोका झाला असे परशुरामास वाटले, त्यांनी मागे वळून पाहिले आणि एका मागुन एक बान सोडले त्यामुळे नदी पार

पातळात गेली पातळातून वर येण्यासाठी पैनगंगेस सात दिवस लागले परशुरामाने जे अनेक बान सोडले त्यामुळेच हा 'कुंड' निर्माण झाला, परंतू नदी मागे येत असताना परशुरामाने मागे वळून पाहिले म्हणजे नदीने घातलेली अट परशुरामाने मोडला त्यामुळे हा प्रसंग निर्माण झाला पुढे एकदा नदीने परशुरामास माफ केले परत पैनगंगा परशुरामाच्या पाठीमागे तीच अट घालून पाठी मागे निघाली माहूर पासून काही अंतरावर परत असेच घडले परशुरामाने नदी पाठीमागे येते का नाही? म्हणून पाटी मागे वळून पाहिले परशुरामाने दिलेला शब्द पाळला नाही म्हणून नदी माहुर पासून काही अंतरावरून परतची त्या ठिकानास परत गंगा टिकाण म्हणून ओळखले जाते यानदीस अनेकानी बांनगंगा या नावान संबोधिते कारण परशुरामाने बान मारून या नदिचा प्रवाह निर्माण केला म्हणून या नदिस बानगंगा या नावानेही ओळखले जाते सहस्त्रकुंडच्या संदर्भात असिही आख्यायिका सांगीतली जाते की या कुंडाचा अंत (खोली) शोधण्यासाठी दोरी सोडण्यात आली सोडत सोडत सात बाजेचे सुंम (सुंम म्हणजे नारळची दोरी) सोडण्यात आली परंतू कुंडच्या खोलीचा अंत लागला नाही या कुंडचा अंत लागत नाही म्हणून या कुंडास 'सहस्त्रकुंड' या नावाने ओळखले जाते असेही सांगीतले जाते की, लक्षपूर्वक पाहिल्यास ओमकार असल्याचे लक्षात येते नदिच्या मधोमध टेकडी आहे या टेकडीस परशुरामाची टेकडी या नावाने ओळखले जाते त्यांच बरोबर आलिकडील मुख्यधारेच्या समोरील बाजुस सितेची न्हानी (स्नानगृह) आहे. असे सांगतात की, अलिकडील धारेतून पडलेला व्यक्ती वाहत सरळे सितेच्या न्हानीत जातो तो जीवंत परत येत नाही आणि लवकर सापडत नाही पलिकडील धारेच्या धबधब्याच्या तुलनेत आलिकडच्या धारलाही आहे. परंतु या धारेवरून पडलेली व्यक्ती एक ही जीवंत सापडले नाही.

सहस्त्रकुंड धबधब्यात सिता न्हानीचा उल्लेख येतो, याचा अर्थ रामायण कालखंडत राम आणि सिता काळकरण्यात असताना काही काळ त्यांचा सहवास या सहस्त्रकुंड धबधब्याच्या परीसरात होता कारण या परीसरात रामायनात राम लक्ष्मण सिता वावररत असल्याच्या अनेक आख्यायिका सांगितल्या जातात म्हणजेच या परिसरात राम, लक्ष्मण, सिता चे वास्तव्य वनवासात असताना कही काळ होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

नांदेड जिल्हयातील सस्त्रकुंड धबधबा एक नाविन्यपूर्ण निर्सगाच सोंदर्य लाभलेल अत्यंत उत्कृष्ट असे ग्रामीण पर्यटन स्थळ आहे. या ग्रमीण पर्यटन स्थाळाच्या विकासाची अवश्यकता आहे पर्यटन स्थळाचा विकास झाल्याशिवाय पर्यटनकांची संख्या वाढत नसते याठीकानी अवश्यक सोईसुविधा झाल्यास हजारो पर्यटन येऊ शकतात व येथील निसर्गसौंदर्य अल्हाददायक हवामानाचा तसेच काश्मिरमध्ये ज्याप्रमाने अंगावर हिमवर्षाव होतो त्या पध्दतीने धबधब्याच्या पाण्याचे कण अंगावर येण्याचा आस्वाद घेता येतो सद्याच्या परिस्थितीत सहस्त्रकुंड धबधब्यास पर्यटन स्थळाचा दर्जा मिळाला असला तरी फारसा विकास झाल्याचे दिसून येत

नाही सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत जिल्हा नियोजन विभाग, नांदेड, यांच्या मार्फत काही प्रमानात सुधारणा झालेल्या आहेत.

याठिकाणी सहस्त्रकुंड बाणगंगा महादेव मंदिर तिर्थक्षेत्र सहस्त्रकुंड ता. किनवट जि. नांदेड संचालक मंडळ असे नोंदनिकृत संस्थान आहे.

सदरिल संस्थान मंडळ खालील प्रमाणे आहे. नोंदणी क्रमांक A २४२७/(नांदेड) दि. १२/०५/२०१८

| अ.क्र. | संचालक मंडळाचे नाव | हुद्दा | पता |
|---|---|---|---|
| १) | श्रीमान शंकरराव गुडेराव वाळकीकर | अध्यक्ष | मु.पो.वाळकी (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |
| २) | श्रीमान योगेश आनंदराव पाटील | उपाध्यक्ष | मु.पो.ईस्लापुर ता.किनवट जि. नांदेड |
| ३) | श्रीमान सतिष शंकरराव वाळकीकर | सचिव | मु.पो.वाळकी (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |
| ४) | श्रीमान नंदुलाल साहेबलाल जयस्वाल | सदस्य | मु.पो.ईस्लापुर ता.किनवट जि. नांदेड |
| ५) | श्रीमान दत्तात्रय सुदाम पालिकोंडवाड | सदस्य | मु.पो.ईस्लापुर ता.किनवट जि. नांदेड |
| ६) | श्रीमान विठ्ठल गणेशराव गंदेवार | सदस्य | मु.पो.ईस्लापुर ता.किनवट जि. नांदेड |
| ७) | श्रीमान सरपंच ग्रा.प.वाळकी (बु) | सदस्य | मु.पो.वाळकी (बु) (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |
| ८) | श्रीमान पोलीस पाटील रोडनाईक तांडा | सदस्य | मु.पो.वाळकी (बु) (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |
| ९) | श्रीमान पोलीस पाटील | सदस्य | मु.पो.वाळकी (बु) (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |
| १०) | श्रीमान बळीराम सिंगाजी चव्हाण | सदस्य | मु.पो.वाळकी (बु) (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |
| ११) | श्रीमान मुख्याद्यापक आश्रम शाळा सहस्त्रकुंड | सदस्य | मु.पो.वाळकी (बु) (सहस्त्रकुंड) ता.किनवट जि. नांदेड |

पैनगंगा नदिच्या तिरावर श्री सहस्त्रकुंड बाणगंगा महादेव मंदिर असुन हे मंदिर पंखमुखी महादेव मंदिर म्हणून प्रसिध्द आहे. अनेक भाविक आणि पर्यटक प्रारंभी मंदिरातील महादेवाचे दर्शन घेऊन नंतर सहस्त्रकुंड धबधबा पाहतात.

सहस्त्रकुंड धबधब्याच्या संदर्भात अनेक आख्यायिका आणि दंतकथा सांगीतल्या गेल्या असल्या तरी त्यामध्ये सर्व तथ्य आहे किंवा सर्वच चुकीचे आहे असे ठरवता येणर नाही. पैनगानदी आहे येथे सहस्त्रकुंड धबधबा पाहावयास मिळतो येथेचे एक भव्यमंदिर आहे. हा धबधबा निर्माण होण्या मागे निश्चितच भैगिलिक परिस्थिती करणीभुत आहे. निसर्गात खुप शक्ती आहे. निसर्गशक्तीचे दैवीकरण ही केले जाते असे इतिहास संशोधकापुढे गहण प्रश्न आहेत की जे आजतागायत सुटू शकले नाहीत प्रभुरामचंद्राने समुद्रात रामसेतु निर्माण केला, मोठमोठया डोंगर रांगा, महाभारतातील लक्षागृह वेरूळ येथील कैलास लेणी अशा अनेक घटना आश्चर्यकारक आहेत त्यापैकीच एक ठिकान म्हणजे सहस्त्रकुंड धबधबा होय.

हे ग्रामीण भागातील अत्यंत महत्वाचे सुंदर निसर्गाचे सोंदर्य लाभलेले पर्यटन आहे. सदरील पर्यटनाचा विकास झाल्यास ग्रमीण भागातील त्या परीसरातील हजारो लोंकाना रोजगार मीळू शकतो. त्यामुळे अनेकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटतो. हे असे पर्यटन ग्रामीण पर्यटन आहे. यातुन ग्रामविकासाबरोबरच या परिसराचा देखील विकास सादला जातो.येथील पर्यटन स्थळाचा विकास झाल्याशिवाय पर्यटकांची संख्या वाढत नाही. त्यासाठी पर्यटनस्थळाचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ :–


१) प्रात्यक्ष सहस्त्रकुंड धबधब्याची व परीसराची पाहणी

२) मुलाखत :– श्री. मारोती दत्तात्र्य वाघमारे सहस्त्रकुंड धबधबा कर्मचारी

३) मुलाखत :– श्री. दिलीप किशन तुंबलवाड सरपंच ग्रा.प.कार्यलय वाळकी (बु) (सहस्त्रकुंड)

४) मुलाखत :– श्री. गणेश निवृत्ती गायकवाड सेवक ग्रा.प.कार्यालय (बु)(सहस्त्रकुंड)